ISBN: 978-81-89839-99-4

# स्त्री : प्रतिमा आणि वास्तव
# स्त्री : छवि और यथार्थ
# Women : Image and Reality

मुख्य संपादक
डॉ. सतीश पावडे

पायगुण
प्रकाशन
अमरावती.
Email-paaygunprakashan22@gmail.com

# अनुक्रमणिका

१. 'इप्टा' तील स्त्री आणि प्रतिमा — डॉ. सतीश पावडे /७
२. स्त्रीवादी कादंबरी: प्रतिमा आणि बास्तव — डॉ. निशा शेंडे/१०
३. दलित स्त्री आत्मकथनातील स्त्री प्रतिमा — प्रा. डॉ. सुशीला धाबे /१२
४. सामाजिक सुधारणा आणि स्त्री प्रतिमा — डॉ.किशोर उत्तमराव राऊत/१५
५. चतुरंगच्या आधारे बास्तवातील स्त्री-प्रतिमा : एक शोध — प्रा. डॉ. पूनम रा. अभ्यंकर/१८
६. लावणीतून व्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा — डॉ. वर्षा चिखले/२१
७. अभिजात प्राचीन साहित्य आणि पुराणकथांमधील स्त्री प्रतिमा — प्रा.डॉ.ममता इंगोले (महल्ले)/२३
८. दलित स्वकथनातील स्त्री प्रतिमा — प्रा. मंदाकिनी मेश्राम/२७
९. स्त्रीवादी स्त्री प्रतिमा : एक आकलन — प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे/२९
१०. ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवन चित्रण — डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे/३१
११. स्त्री प्रतिमा व वेश्या व्यवसाय — प्रा. डॉ. अरूणा बाडेकर/३४
१२. आधुनिकता आणि स्त्री प्रतिमा — डॉ. सारिका विवेक श्रावणे/३८
१३. गौरी देशपांडे यांच्या साहित्याबरील स्त्रीवादाचा प्रभाव — प्रा. प्रभाकर जे. जांभूळे/४०
१४. माज्या जल्माच्या चित्तरकथेतील शांताबाईची स्त्री प्रतिमा — प्रा.डॉ. अविनाश श. धोबे/४३
१५. पाली साहित्यातील थेरिगाथा स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा — प्रा. डॉ. रेखा वानखडे/४६
१६ कृषिसंस्कृतीतील स्त्रीरूपे — प्रा. डॉ. गणेश क. टाले/४८
१७. १८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांच्या साहित्यातील स्वजाणीव — डॉ. प्रवीण बनसोड/५१
१८. मराठी मालिकांतील स्त्री प्रतिमा — प्रा.डॉ. वंदना मोयर/५३
१९. अनिल बर्वे लिखित हमिदाबाईची कोठी या नाटकातील स्त्री प्रतिमा — डॉ. भूमिका गो. वानखडे/५५
२०. इतिहास आणि स्त्री प्रतीमा — डॉ. मिनल खेरडे/प्रा. रजनी गजबे/५७
२१. झोपडपट्टीतील स्त्री : प्रतिमा आणि बास्तव — डॉ. स्मिता वानखेडे/६०
२२. स्त्री प्रतिमा - संकल्पना व स्वरूप आणि बास्तव — प्रा. डॉ. सौ. बनश्री मु. देशपांडे/६४
२३. लोकसाहित्यामधील स्त्रीलोकगीतातील स्त्री प्रतिमा — डॉ.दीपाली प्र. गावंडे/६९
२४. बोल्गा से गंगा मधील स्त्री प्रतिमा — डॉ.सिद्धार्थ भगत/७३
२५. बुद्ध, फुले आंबेडकरवादी विचार प्रणित रंगभूमी आणि स्त्रीवादी चळवळ — डॉ.वैशाली बोदेले /७६
२६. मध्यकालीन भारतातील जनानखान्यातील स्त्री : प्रतिमा व बास्तव — प्रा.पी.व्ही.गावंडे/७९
२७. धर्मग्रंथातील स्त्री प्रतिमा — प्रा.के.ओ. जिरापुरे/८४
२८. आदिवासी स्त्री आणि वास्तव — डॉ. रोहिणी उ. देशमुख/८८
२९. पश्चिम विदर्भातील माळी स्त्रियांची प्रतिमा: समाजशास्त्रीय अध्ययन — डॉ. मंगला दि. तांबेकर/९२
३०. ताराबाई शिंदे कृत स्त्री प्रतिमेची चिकित्सा — प्रा. अनिल ठाकरे/९५
३१. शेतकरी स्त्री : प्रतिमेचे बास्तव — प्रा. मुकेश भा. सरदार/९८
३२. चित्रपटातील स्त्री प्रतिमा — प्रा. सुशिला मळसणे/१००
३३. समकालीन समाजातील स्त्री प्रतिमेची ताराबाई शिंदे यांनी केलेली चिकीत्सा :- एक समाजशास्त्रीय अध्ययन — सुयोधम देशमुख /१०३
३४. स्त्रीवादी साहित्य- स्त्रियांच्या आत्मचरित्राची परंपरा — प्रा. रोशनी एस. बैस/१०५

 ISBN: 978-81-89839-99-4

# शेतकरी स्त्री : प्रतिमेचे वास्तव

प्रा. मुकेश भा. सरदार
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा,
जि.अमरावती-४४४ ८०७
Email-mbsascc1@gmail.com
चे. ९१३०५५४८४९

**स्त्री प्रतिमा वास्तव:**

स्त्री या विषयावर लिहण्यास धाडस करणे हे एक आव्हानच आहे. मातपिताय नम: म्हणजे मातेला प्रथम पुजावे लागते. कारण ती शक्तीचा, उर्जेचा स्त्रोत होय. स्त्री शक्ती ही सहनशील असून ती कधीही आपली भावना स्वत:हून पुरूषाकडे व्यक्त करीत नाही याउलट पुरूष आक्रमक आहे. अग्रेसिव आहे. उताविळता त्याच्या रक्तात भिणलेली आहे. स्त्री ही नवनिर्मिती करणारी जन्मत:च सर्जनशील आहे. तिच्या सर्जनशीलशक्तीसमोर पुरूष दुबळा, लगंडा अभागी आहे. स्त्री ही पुषाला आकर्षित करते पण पुरूष तिला आकर्षित करू शकत नाही. स्त्रीचा देह हा मादक असून तिचे हावभाव, चालणे, बोलणे पुरूषावर भुरळ घालते. पुरूष जे नवनिर्माण करते त्याबाबतीत स्त्रीचा प्रतिसाद त्याला नम्रच मिळतो कारण स्त्री ही मुलाला जन्म देऊन या सृष्टीवर अनंत उपकार करतो. त्या ज्या प्रसववेदना सहन करते तशा वेदना कोणताच पुरूष सहन करू शकत नाही. एक अणूबॉम्ब तयार करायला जी शक्ती लागते तितकी शक्ती मुलाला जन्माला घालताना लागते. त्यामुळे स्त्री ही हिमालय असून पुरूष तिच्यासमोर एखादा मोडकातुटका वृक्ष जो केव्हाही वादळाने पडू शकतो. मात्र स्त्री ही हिमालयपर्वत असल्यामुळे तिला वादळ वारा पराभूत करू शकत नाही. एखादी वेश्या व्यवसाय करणारी स्त्री जर सुंदर असेल तर तिच्या शरीरावरून पन्नास लोक उतरले नसतील कशावरून ! हेच काम पुरूष करू शकतो काय ? नाही यावरून स्त्रीची शारीरिक क्षमता पुरूषाच्या तुलनेत सुदृढ आहे ती पुरूषापेक्षा जीवन जास्त जगते ती अनेक सकंटाना सामोरे जावून कुटुंबाला व्यवस्थित ठेवते. तिच्यात पुरूषापेक्षा जास्त शक्ती असल्यामुळेच तिची शक्तीवर येऊ नये म्हणून तिला पुरूष सतत दाबून ठेवतो. पुरूषाला जाणीव आहे की, स्त्रीत शक्ती प्रचंड आहे. त्याचा कसा वापर करावा हे पुरूषी संस्कृतीने चांगले जाणले असल्यामुळेच स्त्रीची घोर विटंबना होताना दिसते. मनुस्मृतीने तर स्त्रीवर भयंकर निर्बंध लादून स्त्रीचे स्त्रीपणच नाकारले. त्यामुळे आज देशात कायदा असूनही पुरूषाच्या मनातील मनुस्मृती गेली नाही असे म्हटले तरी वावगे ठरू नये. लोकशाही यशस्वी अजूनही झाली नाही. त्याचे प्रमुख कारण जातीभेद तसेच स्त्री-पुरूष विषमताच हे आहे. हे प्रत्येक स्त्री-पुरूषाने समजून घेतले पाहिजे. कारण स्त्रीला अजूनही गुलामीत आनंद वाटतो हे स्त्री प्रतिमेचे खरे वास्तव आहे. ती चारभिंतीच्या पलिकडे अजूनही पाहायला धजत नाही. ती परपुरूषासोबत वैचारिक, भावनिक संबंध प्रस्थापित करण्यास नेहमीच कमी पडत आली आहे. याचे कारण तिला सतत वाटत असते की माझ्या स्त्रीत्त्वाला धक्का लागू नये आणि ते नैसर्गिकदृष्ट्या खरेही आहे. लहानपणात किंवा अपुऱ्या वयात असताना स्त्रीचा जर पुरूषाशी शारीरिक संबंध आला तर त्या स्त्रीची पूर्ण स्त्रीयंत्रणा बिघडून जाते. तिचे भावविश्व उद्ध्वस्त होऊन जाते. याची जाणीव तिला असल्यामुळे ती शीलाला धक्का लागू देत नाही. ती परपुरूषासोबत शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देते. निसर्गत: पुरूषाने कोणत्याही स्त्रीशी शारीरिक संबंध ठेवल्यास त्यांच्या शारीरिक रचनेमध्ये कोणताच फरक पडत नाही किंवा बदलही होत नाही. त्यामुळेच पुरूष हा व्यभिचार करू शकतो पण स्त्री नाही. समाज पुरूषाचा व्यभिचार खपवून घेतो मात्र समाज स्त्रीचा व्यभिचार खपवून घेत नही हे स्त्री प्रतिमेचे वास्तव सांगता येईल. एखाद्या स्त्रीने याचे उल्लघंन केल्यास समाज तिला भयंकर शिक्षा करतो. तिचे जीवनच संपवून टाकतो. हे आपण रोजच ऐकतो अन् वाचतो.

**शेतकरी स्त्री :**

वास्तविकता स्त्री ही स्त्रीच असते. ती आधुनिक, वैज्ञानिक शेतकरी वगैरे काही नसते. कारण आधुनिक वैज्ञानिक स्त्री देखील आपल्या घरच्या नंतर दुसऱ्या घराचा विचार करू शकत नाही. कारण शिकलेली स्त्री असो की, अडाणी स्त्री असो तिला 'चूल आणि मूल' याच्या पलिकडे दुनिया आहे असे वाटत नाही. फरक फक्त सुखसुविधा, वातावरण शिक्षण याचा असतो.

शहरी स्त्रीला खूप सुख सुविधा असतात त्या तुलनेत शेतकरी स्त्रीला काही सुविधा नसतात. शेतकरी स्त्रीला उघडयावर शौचास बसावे लागते. हाफसी, विहीर व नळावन दररोज तिला पाणी भरावे लागते. दररोज सळासारवण करावे लागते. स्वयंपाक करून कुटूंबातील



ISBN: 978-81-89839-99-4

सर्वांना जेवू घालून तिला शेतात कामाला जावे लागते. पेरणी करताना तिला हातात सरत धराव लागते. बैलजोडी मागे तिला चालावे लागते. या निमित्त येणार तिचा पुरूषाशी संपर्क हा नैसर्गिक असून नात्याचं पालन ती करत असते. गंमतीजमंती करून काम करण्यात तिला आनंद मिळतो. दुपारचे जेवणं एखाद्या काटीखाली बसून ती करते. दोन-चार बाया एकत्र येऊन जेवणांचा आनंद लुटतात. तिचे फारसे कपड्याकडे लक्ष नसते. ती कमीभावाचे लुगडे साडया घालते. कधी-कधी ती फाटके लुगडे घालूनही शेतात काम करते. शेतातील वेगवेगळे वाण ती घरी येताना घेऊन येते. आणि आपल्या मुलाबाळांना देते. त्यानंतर चहा करून लेकरांना जेवू घालते. तिला आर्थिक ज्ञान फार नसून तिच्या गरजाही फार कमी आहेत. आपल्या मुलांनी शिकून मोठे साहेब व्हावे असे तिला वाटते. आपल्या मुलांनी शेती करू नये. त्यापेक्षा शिकून एखादी नोकरी करावी अशी तिची इच्छा असते. तिच्या बोलण्याचा विषयही हाच असतो. मागचे दिवस किती चांगले होते असे भुतकाळाचे आकर्षणही तिला असते. सण उत्सव, उपास करण्यास तिला खूप आनंद मिळतो. देवधर्माचे प्रचंड आकर्षण तिला आहे. आपल्या पतीला देवता समान मानून त्याच्या सदैव आज्ञेत ती राहते. पतीवर जिवापाड प्रेम करते पण अज्ञानामुळे नवराबायकोचे थोडयाथोडया कारणावरून खटके उडतात. त्यामुळे शेतकरी स्त्री ही भांडण करताना ही दिसते. ती पाण्यावरून, कचरा फेकण्यावरून, मुलाला मारल्यावरून इतरांसोबत भांडते ती कष्ट करू करू शारीरिकदृष्ट्या खंगून जाते. चेहऱ्यावर सौंदर्याऐवजी चिंता निस्तेजपणा आलेला असतो. तरीही चिवटपणे जीवन जगत असतो. कुठून येते इतकी उर्जा. हया माऊलीसमोर आदराने झूकून जावें असे वाटते. पण कुठेही जावो कुठेही असो मात्र आपल्या शीलाला धक्का न लागता जगत असते. तिच्या अस्तित्त्वाला अन् तिच्या वात्सल्याला माझा कोटी कोटी प्रणाम.

**संदर्भ ग्रंथ :-**


१ दलित स्त्रियांची आत्मकथने स्वरूप आणि चिकित्सा
लेखक - डॉ. मनोहर जाधव
प्रकाशक - सुविद्या प्रकाशन १४९ शनिवार पेठ पुणे-४११ ०३०
२. ग्रामीण साहित्य - लेखक डॉ.म.सु. पगारे
प्रकाशक - दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. २५१ क,
शनिवारपेठ पुणे-४११ ०३०
३. ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरूष मुलांना
प्रकाशन कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९०
४. मला उद्ध्वस्त व्हायचंय, लेखिका - अमरशेख मल्लीका,
प्रकाशक - मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई-४ जून १९८४


◆◆◆



ISBN: 978-81-89839-99-4